<u>विशेष दिवाणी दावा क्र. ४९/२०१४ मध्ये निशाणी क्र. ७९ कडील अर्जावर</u>

<u>आदेश</u>

१) निशाणी क्र. २९ कडील यादीसोबत अनु. क्र. १२ ते १५ कडे दाखल कागदपत्रांना व अनु. क्र. २१ ते २६ कडे दाखल असलेल्या कागदपत्रांना निशाणी क्रमांक देण्यासाठी वादीतर्फे प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२) वादीने प्रस्तुत अर्जात असे कथन केले आहे की, वादीने निशाणी क्र. २९ कडील यादीसोबत अनु. क्र. १२ कडे द्वितीय विशेष लेखापरीक्षक वर्ग–१, सहकारी संस्था (साखर) सातारा यांनी दिलेल्या लेखा परीक्षण अहवालाची सत्यप्रत दाखल केली आहे. सदर अहवाल हा सार्वजनिक दस्त आहे. तसेच वादीने निशाणी क्र. २९ कडील यादीसोबत अनु. क्र. १३ ते १५ कडे जिल्हा सहकार अधिनियमांन्वये झालेल्या लेखापरीक्षणाचे अस्सल अहवाल दाखल केले आहेत. सदरचे कागद हे सार्वजनिक दस्तऐवज आहेत. वादीने पुढे असे कथन केले आहे की, वादीने निशाणी क्र. २९ कडील यादीसोबत अनु. क्र. २१ ते २५ कडे महाराष्ट्र शासनाच्या वजन मापे कायद्यान्वये नियुक्त केलेल्या सरकारी अधिकारी यांनी वादी कारखान्याच्या वजन काट्याची तपासणी व पडताळणी करुन दिलेले अहवाल दाखल केले आहेत. सदरचे अहवाल हे सार्वजनिक दस्तऐवज आहेत. वादीने पुढे असे कथन केले आहे की, निशाणी क्र. २९ कडील यादीसोबत अनु. क्र. २६ कडे निवडणुक निर्णय अधिकारी यांनी दिलेली निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी दाखल केली आहे. सदर यादीवर सरकारी अधिकारी यांचा सही व शिक्का आहे व त्यामुळे तो सार्वजनिक दस्त आहे. वादीने प्रस्तुत अर्जात अशी विनंती केली आहे की, निशाणी क्र. २९ कडील यादीसोबत अनु. क्र. १२ ते १५ कडे दाखल कागदपत्र व अनु. क्र. २१ ते २६ कडे दाखल असलेले कागदपत्र हे सार्वजनिक दस्तऐवज असल्याने त्यास निशाणी क्रमांक देण्यात यावा.

३) प्रतिवादींतर्फे प्रस्तुत अर्जास दिलेल्या निशाणी क्र. ८० कडील म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, सदर अर्जात नमूद केलेला कोणताही कागद सार्वजनिक दस्तऐवज नाही. सदर अर्जात नमूद केलेला कोणताही कागद भारतीय साक्ष कायद्यातील तरतुदीनुसार शाबीत झालेला नाही व त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४) प्रस्तुत अर्जाच्या कामी दोन्ही पक्षांतील विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादीने निशाणी क्र. २९ कडील यादीसोबत अनु. क्र. १२ कडे द्वितीय विशेष लेखापरीक्षक वर्ग–१, सहकारी संस्था (साखर) सातारा, यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा कलम ८१ त्या अनुषंगिक नियम ६९ अन्वये दिलेला लेखापरीक्षकाचा अहवाल दाखल केला आहे. माझ्या मते सदरचा दस्त म्हणजेच द्वितीय विशेष लेखापरीक्षक वर्ग–१ यांनी दिलेला लेखापरीक्षकाचा अहवाल हा सार्वजनिक दस्तऐवज आहे. त्यामुळे माझ्या सदर लेखापरीक्षकाच्या अहवालास निशाणी क्रमांक देण्याची विनंती समर्थनीय आहे.

६) रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादीने निशाणी क्र. २९ कडील यादीसोबत अनु. क्र. १३ ते १५ कडे वादीने त्यांच्या सी. ए. कडून प्राप्त केलेला लेखापरीक्षणाचा अहवाल दाखल केला आहे. वादीचे सी. ए. हे लोकसेवक नाहीत व त्यामुळे माझ्या मते वादीच्या सी. ए. ने दिलेला लेखा परीक्षणाचा अहवाल सार्वजनिक दस्तऐवज नाही. सदरचे लेखा परीक्षण अहवाल भारतीय साक्ष पुरावा कायद्यातील तरतुदीनुसार सिद्ध केल्याशिवाय त्यास निशाणी क्रमांक देता येणार नाही. त्यामुळे सदर निशाणी क्र. २९ कडील यादीसोबत अनु. क्र. १३ ते १५ कडे

दाखल असलेल्या लेखा परीक्षण अहवालांना निशाणी क्रमांक देण्याची विनंती समर्थनीय नाही.

७) रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादीने निशाणी क्र. २९ कडील यादीसोबत अनु. क्र. २१ ते २५ कडे निरीक्षक, वैध मापन शास्त्र, कराड–१, विभाग कराड यांनी दिलेली पडताळणी प्रमाणपत्रे दाखल केली आहेत. माझ्या मते सदरचे दस्त म्हणजेच निरीक्षक, वैध मापन शास्त्र, कराड–१, विभाग कराड यांनी दिलेली पडताळणी प्रमाणपत्रे हे सार्वजनिक दस्तऐवज आहेत. त्यामुळे माझ्या सदर पडताळणी प्रमाणपत्रांना निशाणी क्रमांक देण्याची विनंती समर्थनीय आहे.

८) रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादीने निशाणी क्र. २९ कडील यादीसोबत अनु. क्र. २६ कडे निवडणुक निर्णय अधिकारी यांनी दिनांक ०१/१०/२०१४ रोजी दिलेल्या निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीची छायांकीत प्रत दाखल केली आहे. कोणत्याही दस्ताची छायांकीत प्रत पुराव्यामध्ये थेटपणे ग्राह्य नाही. त्यामुळे सदर यादीस निशाणी क्रमांक देण्याची विनंती समर्थनीय नाही. त्यामुळे वरील नमूद कारणांमुळे माझ्या मते प्रस्तुतचा अर्ज अंशत: मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज खालीलप्रमाणे अंशत: मंजूर करण्यात येतो.

२) निशाणी क्र. २९ कडील यादीसोबत अनु. क्र. १२ कडे दाखल केलेल्या लेखापरीक्षकाच्या अहवालास व तसेच अनु. क्र. २१ ते २५

कडे दाखल केलेल्या पडताळणी प्रमाणपत्रांना निशाणी क्रमांक देण्यात येतो.

३) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2026.01.03 17:51:07 +0530

दिनांकः– ०३/०१/२०२६ (पां. लिं. घुले)

ठिकाणः– कराड. २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.